**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८**

**अ प्रभाग समिती**

**सभावृत्तांत [कार्यपत्रिका क्रमांक 07]**

**दिनांक : 10/08/2021** **वेळ : सकाळी 11.30 वा.**

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे ऑगष्ट **2021 ची** मासिक सभा मंगळवार दिनांक 10/**08/2021** रोजी सकाळी **11.30 वा.** अ क्षेत्रीय कार्यालयातील "**राजमाता जिजाऊ सभागृह**" येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा.शर्मिला राजू बाबर | सभापती |
| 2. | मा. अनुराधा गणपत गोरखे | सदस्या |
| 3. | मा.यादव मिनल विशाल | सदस्या |
| 4. | मा.शैलजा अविनाश मोरे | सदस्या |
| 5. | मा. अमित राजेंद्र गावडे | सदस्य |
| 6. | मा.कोमल दिपक मेवानी | सदस्या |
| 7. | मा. शितल उर्फ विजय गोरख शिंदे | सदस्य |
| 8. | मा. कांबळे राजेंद्र नामदेव | स्वीकृत सदस्य |

याशिवाय मा.श्रीमती सुचिता पानसरे- प्र. क्षेत्रिय अधिकारी, मा.श्री. रविंद्र पवार-कार्यकारी अभियंता (स्थापत्य),मा.श्री प्रवीण घोडे- कार्यकारी अभियंता(विद्युत),मा.श्री शिवाजी लोखंडे-लेखाधिकारी,मा.श्री के.डी.दरवडे-सहा.आरोग्याधिकारी, मा.श्री संजय खरात-उपअभियंता(स्थापत्य) मा.श्री लांडे बी.पी.-उपअभियंता (विद्युत), मा.श्री बोरावके देवेंद्र-उपअभियंता(उद्यान स्थापत्य), मा.श्री दिपक कुंभार-उपअभियंता(पाणी पुरवठा), मा.श्री बाळसाहेब शेटे-उपअभियंता (स्थापत्य),श्री बनसोडे एस.पी.-कनिष्ठ अभियंता(विद्युत),श्री पवार व्ही.एस.-कनिष्ठ अभियंता(विद्युत),श्री गिरिश गुठे-कनिष्ठ अभियंता(स्थापत्य), श्री कोतकर पी.बी.-कनिष्ठ अभियंता(झोनिपु स्थापत्य),श्री शेख एस.के.-कनिष्ठ अभियंता(झोनिपु स्थापत्य), श्री कोटीयाना डी.एम.-आरोग्य निरिक्षक (पशुवैद्यकिय विभाग), श्री मनोज शिंदे-मुख्य लिपिक, श्री कारंडे आर.पी.क्रिडा पर्यवेक्षक, श्री डी.जी.कांबळे-उद्यान सहाय्यक, श्री पगार एस.जी.-जनरेटर ऑपरेटर इ. अधिकारी/कर्मचारी बैठकीस उपस्थित होते.

सर्वप्रथम मा. सभापती, शर्मिला राजू बाबर यांनी सर्व उपस्थित पदाधिकारी, सन्मा. नगरसदस्य, अधिकारी यांचे स्वागत करुन सभेची सुरुवात करणेस अनुमती दिली.

यानंतर बैठकीचे कामकाज सुरु करणेत आले.

कार्यपत्रिका क्रमांक ६ दिनांक ९/३/२०२१ रोजी झालेल्या अ प्रभाग समिती सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत असलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

त्यानंतर प्रस्तुत सभेमध्ये खालील विषय ऐनवेळचे विषय म्हणून दाखल करुन घेण्यात आले.

**विषय क्रमांक २:-** सन्मा.सदस्या शैलजा अविनाश मोरे यांचा दिनांक १०/०८/२०२१ रोजीचा प्रस्ताव.

सिध्दीविनायक नगरी अप्पूघर मधून प्राधिकरण निगडी,आकुर्डी कडे जो रस्ता जातो त्या मार्गास "कै सिताराम बाबुराव काळभोर" असे नामकरण करणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणे.

**विषय क्रमांक ३:-** सन्मा. सदस्या मंगलाताई कदम,सन्मा.सदस्या अनुराधा गणपत गोरखे, सन्मा. सदस्य् तुषार हिंगे, सन्मा. सदस्य् मा.केशव घोळवे यांचा दिनांक ०९/०८/२०२१ रोजीचा प्रस्ताव.

चिंचवड ऑटो क्लस्टर ते के एस बी चौकादरम्यान बी आर टी मार्गावर मोरवाडी स्मशनाभूमी जवळीस चौकास "उद्योजक प्रदीप रामचंद्र गायकवाड" असे नाव देण्याचे प्रस्तावास मान्यता देणे.

**विषय क्रमांक ४:-** सन्मा.सदस्या शैलजा अविनाश मोरे यांचा दिनांक १५/०७/२०२१ रोजीचा प्रस्ताव.
ट्रान्स्पोर्टनगर निगडी येथील सहारा कम्युनिकेशन जवळील चौकाचे **"कै बाबासाहेब धुमाळ चौक"** असे नामकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणे.

**विषय क्रमांक ५:-** सन्मा.सभापती शर्मिला राजू बाबर यांचा दिनांक १०/०८/२०२१ रोजीचा प्रस्ताव.
निगडी प्राधिकरण से.नं.२७ /ए मधील सिटी प्राईड शाळेच्या मागील परिसरास "श्री अग्रसेन महाराज नगर" असे नामकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणे.

**सभेत खालीलप्रमाणे ठराव मंजूर करणेत आले.**

ठराव क्रमांक 07
दिनांक 10/08/2021
सुचक: शितल उर्फ विजय शिंदे

विषय क्रमांक 1
विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : शर्मिला राजू बाबर

संदर्भ:- १) सन्मा.सदस्या अनुराधा गणपत गोरखे यांचा दिनांक १३/०७/२०२१ रोजीचा प्रस्ताव.

विद्यानगर गोल्डन चौकातील बंद असलेला मोकळा हॉल (जेष्ठ नागरिक विरंगुळा केंद्रा शेजारील) बरेच दिवसापासून बंद असून तेथे पूर्वी अंगणवाडी चालत होती. परंतु सध्या भागात अंगणवाडीसाठी स्वतंत्र टेंडर झाले असून लवकरच तेथे बांधकाम होईल.

तरी सामाजिक उपक्रमासाठी विद्यानगर गोल्डन चौकातील बंद असलेला मोकळा हॉल शिवनयन मित्र मंडळ (रजि.नं./महाराष्ट्र/८६/२००७) यांना देण्याचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 08
दिनांक: 10/08/2021
सुचक: मा.सौ.शैलजा अविनाश मोरे

विषय क्रमांक 2
विभाग: सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक मा. शर्मिला राजेंद्र बाबर

संदर्भ:- १) श्री तानाजी बळवंत काळभोर व इतर ५ यांचा दि.१०/८/२०२१ रोजीचा अर्ज.
२) सन्मा.सदस्या शैलजा अविनाश मोरे यांचा दिनांक १०/०८/२०२१ रोजीचा प्रस्ताव.

उपरोक्त संदर्भिय क्र.१ चे पत्रान्वये श्री तानाजी बळवंत काळभोर व इतर ५ यांची त्यांचे दि.१०/८/२०२१ चे अर्जान्वये कळविले आहे की, ते निगडी परिसरातील भूमिहिन शेतकरी आहेत. त्यांचे कुटुंबाची इ.स.१९७२ साली पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने १० एकर जामिन संपादित केली तसेच सिध्दीविनायक नगरी परिसरातील नागरिकांना जाणे-येण्यासाठी ३५ गुंठे जागा त्यांचे परिवाराने सिध्दीविनायक डेव्हलपर्स यांना दिल्यानंतर या परिसरातील नागरिकांसाठी जाणे-येण्यासाठी रस्ता उपलब्ध झाला. त्यासाठी त्यांचे कुटुंबाचे मोठे योगदान आहे, असे कळविले आहे. तरी वाहतूक नगरीतील बालाजी पेट्रोल पंप शेजारुन खंडोबा मंदिरासमोरुन जो रस्ता दत्तनगर,सिध्दीविनायक नगरीतून प्राधिकरण निगडीकडे जातो त्या रस्त्यास "कै.सिताराम बाबुराव काळभोर" असे नामकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 09 | विषय क्रमांक 3
दिनांक 10/08/2021 | विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. अनुराधा गोरखे | अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ:- सन्मा.सदस्या मंगलाताई कदम, सन्मा.सदस्या अनुराधा गोरखे, सन्मा. सदस्य तुषार हिंगे, सन्मा.सदस्य केशव घोळवे यांचा दिनांक ०९/०८/२०२१ रोजीचा प्रस्ताव.

चिंचवड ऑटो क्लस्टर ते के एस बी चौकादरम्यान बी आर टी मार्गावर मोरवाडी स्मशानभूमी जवळील चौकाचे नामकरण करुन या चौकाला कालकथित उद्योजक प्रदीप उर्फ बाळासाहेब रामचंद्र गायकवाड यांचे नाव देण्यात यावे.

या रस्त्यावरील देखभाल व दुरुस्तीसाठी प्रदीप गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेऊन पाठपुरावा करीत नागरिकांना या रस्त्याने सुरक्षितपणे प्रवास करण्यासाठी अनेकदा प्रयत्न केले तसेच प्रशासनाला या संदर्भात सतत सहकार्य करुन दिले. उद्योजक प्रदीप गायकवाड यांचे करोना आजाराने निधन झाले. या रस्त्यावरील चौकाला त्यांचे नाव दिल्यास स्थानिक नागरिकांना त्यांच्या समाज कार्याची सतत प्रेरणा राहिल. यामुळे या चौकाला उद्योजक प्रदीप रामचंद्र गायकवाड यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी येथील नागरिकांची आहे.तरी नागरिकांच्या मागणीचा विचार करुन चिंचवड ऑटो क्लस्टर ते के एस.बी.चौका दरम्यान बी आर टी मार्गावार मोरवाडी स्मशानभूमी जवळील चौकास **"उद्योजक प्रदीप रामचंद्र गायकवाड"** असे नामकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 10 | विषय क्रमांक 4
दिनांक 10/08/2021 | विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. शैलजा अविनाश मोरे | अनुमोदक : मा. शर्मिला राजेंद्र बाबर

संदर्भ:- सन्मा.सदस्या शैलजा अविनाश मोरे यांचा दिनांक १५/०७/२०२१ रोजीचा प्रस्ताव.

ट्रान्स्पोर्टनगर निगडी येथील सहारा कम्युनिकेशन जवळील चौकाचे "कै.बाबासाहेब धुमाळ चौक" असे नामकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 11 | विषय क्रमांक 5
दिनांक 10/08/2021 | विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. शर्मिला राजू बाबर | अनुमोदक : मा. शैलजा अविनाश मोरे

संदर्भ:- सन्मा.सभापती शर्मिला राजू बाबर यांचा दिनांक १०/०८/२०२१ रोजीचा प्रस्ताव.

निगडी प्राधिकरणातील से.२७/ए मधील सिटी प्राईड शाळेच्या मागील परिसराला श्री अग्रसेन महाराज नगर असे नामकरण करण्यात यावे ही मागणी या परिसरातील राहणा-या अनेक रहिवासी नागरिकांची आहे. तरी निगडी प्राधिकरणातील से.२७/ए मधील सिटी प्राईड शाळेच्या मागील परिसराला **"श्री अग्रसेन महाराज नगर"** असे नामकरण करण्याचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. सभापती- शर्मिला राजू बाबर, अ प्रभाग समिती यांनी सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, पदाधिकारी/अधिकारी यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

[ शर्मिला राजू बाबर ]
सभापती
अ प्रभाग समिती
निगडी- 44

क्रमांक:-अक्षेका/9/कावि/73 /2021 दिनांक:-13/08/2021.

(सुचिता पानसरे)
प्रशासन अधिकारी
तथा सचिव, सभा शाखा
अ प्रभाग समिती, निगडी-44

प्रति,
सर्व संबंधित ----------------------------